अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या नाशिक ,धुळे ,यवतमाळ ,चंद्रपूर , रायगड ,गडचिरोली ,नंदुरबार व पालघर या ८ जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय गट-क व गट-ड संवर्गातील पदांसाठी आरक्षण विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.१५३/१६-ब**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : २३ सप्टेंबर, २०२१.

<u>वाचा</u>:- १.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-१०७२-J,दि.६ जून,१९७२

२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-११८७/प्र.क्र.२७७६/(सीआर-२९६/८७/१६-ब,दि.१५ ऑक्टोबर,१९८७

३.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-१०९८/प्र.क्र.११६/९८/१६-ब,दि.२२ सप्टेंबर,१९९९

४.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-२००१/३५३/प्र.क्र.१४/२०००/१६-ब,दि.१३ ऑगस्ट,२००२

५. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-२०१५/प्र.क्र.१०२A/१५/१६-ब,दि.१९ जानेवारी,२०१६

६. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो- ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२ फेब्रुवारी,२०१९

७. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दि.४ जुलै,२०१९

८. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१५३-ए/१६-ब,दि. १२ जून,२०२०

९. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब, दि.६ जुलै,२०२१

<u>**प्रस्तावना**</u>-

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधीसूचित जमाती, (विमुक्त जाती.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी) आरक्षण अधिनियम २००१ अनुसार राज्यात अनुसूचित जमातीसाठी ७% आरक्षण विहित केलेले आहे. परंतु,संदर्भाधिन १ ते ५ येथील शासन निर्णयांन्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या नाशिक, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, रायगड, गडचिरोली, नंदुरबार व पालघर या ८

जिल्हयांमध्ये गट-क व गट-ड संवर्गातील पदांसाठी अनुसूचित जमातीचे वाढीव आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| **जिल्हा** | **आरक्षण अधिनियम २००१ नुसार अनुसूचित जमातीसाठी नियमित आरक्षण** | **अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण दिलेल्या शासन निर्णयाचा दिनांक** | **अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण** |
|---|---|---|---|
| नाशिक | ७% | दि६.६.१९७२ .<br>(संदर्भ क्र.१) | २२% |
| धुळे | ७ % | | २२% |
| यवतमाळ | ७ % | | १४% |
| चंद्रपूर | ७ % | | १५% |
| रायगड(कुलाबा) | ७ % | | ९% |
| गडचिरोली | ७ % | दि१५.१०.१९८७ .<br>(संदर्भ क्र.२) | १५% |
| | | दि१३.८.२००.२<br>(संदर्भ क्र.४) | २४% |
| नंदुरबार | ७ % | दि२२.९.१९९९ .<br>(संदर्भ क्र.३) | २२% |
| पालघर | ७ % | दि१९.०१.२०१६ .<br>(संदर्भ क्र.५) | २२% |

आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय संवर्गामध्ये अनुसूचित जमातीस वाढीव आरक्षण देण्यासाठी, आरक्षणाची एकूण मर्यादा ५२% च्या मर्यादेत ठेवण्यासाठी , अन्य मागास प्रवर्गाचे आरक्षण काही प्रमाणात कमी करण्यात आले होते. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.६ मधील दि.१२.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता १०% आरक्षण व संदर्भ क्र.७ मधील दि.४.७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता १३% आरक्षण विहित केल्यामुळे सद्य:स्थितीत आरक्षणाची एकूण मर्यादा ७५% झालेली आहे. तथापि,मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.५ मे,२०२१ च्या निर्णयान्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाचे १३% आरक्षण रद्द केले असल्यामुळे राज्यातील आरक्षणाची एकूण मर्यादा ६२% झाली आहे. त्याअनुषंगाने राज्यातील पालघर, धुळे, नंदुरबार, नाशिक, यवतमाळ, गडचिरोली, रायगड व चंद्रपूर या ८ आदिवासी बहुल जिल्हयात इतर मागासवर्ग प्रवर्ग तसेच विमुक्त जाती- भटक्या जमाती या प्रवर्गाची प्रचलीत आरक्षणाची टक्केवारी व प्रवर्गाची असलेली लोकसंख्या विचारात घेऊन यासंदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी मंत्रिमंडळास अहवाल सादर करण्याकरीता मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.८ मधील दिनांक १२ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या नाशिक ,धुळे ,यवतमाळ ,चंद्रपूर ,रायगड , गडचिरोली ,नंदुरबार व पालघर या ८ जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय गट-क व गट-ड संवर्गातील

पदांसाठी सुधारीत आरक्षण विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:**

इंद्रा साहनी प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेली आरक्षणाची ५०% ची मर्यादा तसेच आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी विहित करण्यात आलेल्या १०% आरक्षणाची मर्यादा पाळण्यासाठी अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या नाशिक, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, रायगड, गडचिरोली, नंदुरबार व पालघर या ८ जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय गट-क व गट-ड संवर्गातील पदांसाठी खालीलप्रमाणे सुधारीत आरक्षण विहित करण्यात येत आहे:-

| जिल्हा | अनु. जाती | अनु. जमाती | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण अधिनियम, २००१ अनुसार आरक्षण | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% |
| पालघर | १०% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १५% | १०% | ३०% |
| नाशिक | १०% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १५% | १०% | ३०% |
| धुळे | १०% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १५% | १०% | ३०% |
| नंदुरबार | १०% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १५% | १०% | ३०% |
| यवतमाळ | १२% | १४% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १७% | १०% | ३४% |
| चंद्रपूर | १३% | १५% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३०% |
| गडचिरोली | १२% | २४% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १७% | १०% | २४% |
| रायगड | १२% | ९% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३७% |

२. वरीलप्रमाणे सुधारीत आरक्षणानुसार आदिवासी बहुल जिल्ह्यांकरीता सुधारीत बिंदुनामावली स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय, निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०९२३१६१५०६९५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=41d02a5c663d2c05d362d4847bea4a1874fda4e9cb60284fb102fd7b9b3891b3, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2021.09.23 16:16:14 +05'30'

**( र. अं. खडसे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.माननीय राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३.मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

४.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५.माननीय  विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
६.माननीय  विरोधी पक्षनेता,विधानसभा
७.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
८.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
९.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
११.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१२.सर्व विभागीय आयुक्त,
१३.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१४.सर्व जिल्हाधिकारी,
१५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१८.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१९.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
२०.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२१.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२२.सचिव,राज्य माहिती आयोग,
२३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२४.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२५.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका/नगरपंचायती
२७.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२८.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२९.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
३०.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३१. निवड नस्ती १६-ब.